**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.-- शुध्दीपत्रक**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७**
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०९ जानेवारी, २०२३

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र.इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०७.०८.२०२३

(२) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.२०२३-आरोग्य-२०२३/प्र.क्र.०९/योजना-०६/२५२८/२०२४, दिनांक ०८.०१.२०२४

**शासन शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०२३ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद २ (क) पुढीलप्रमाणे आहे:-

२ (क) "सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार अथवा त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींनी आरोग्य योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांना शासकीय योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही. मात्र, त्या बांधकाम कामगाराचा अथवा कुटुंबातील पात्र लाभार्थ्यांच्या उपचारावरील खर्च रुपये ५.०० लक्षपेक्षा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सहमतीने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरीता सदर लाभार्थी पात्र राहील."

त्याऐवजी परिच्छेद २ (क) पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:-

२ (क) "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनांपैकी एक योजना निवडण्याचा विकल्प द्यावा. बांधकाम कामगारास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही. एकदा बांधकाम कामगाराने पर्याय निवडल्यास, त्याच योजनेंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल."

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य" योजनेचा पर्याय निवडणाऱ्या बांधकाम कामगारावर अन्य लाभार्थ्याप्रमाणेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मोफत उपचार करण्यात यावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा.सो.खताळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रतः-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधीमंडळ सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)